# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

## २०२२-२३

## क्र.प्रले(को)/एफआयबी/२३ दि.२३.०२.२०२३

विषय : एसव्हीसी को.ऑपरेटिव.बँक लि. या बँकेस (१९८ शाखांमार्फत) महानगरपालिका निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या मासिक निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन वितरण व्यवस्थेत समाविष्ट करण्याबाबत.

संदर्भ : महाव्यवस्थापक, एसव्हीसी को.ऑप.बँक लि. यांचे क्र.आरबी/22-23/13072022001 दि.१९.०७.२०२२ चे पत्र.

बृहन्मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांचे मासिक निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन ९ राष्ट्रीयकृत बँका,४ सहकारी बँका मिळून एकूण 13 बँकांच्या विविध शाखांमार्फत ई.सी.एस. द्वारे वितरीत केले जाते. मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) यांच्या दि. ०५.०१.२०२३ च्या मंजूरी क्र.अति.आ./प्रकल्प/६८७४ अन्वये या योजनेत एसव्हीसी को.ऑप.बँक लि. या बँकेस मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्तीवेतन धारक /कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांचे मासिक निवृत्तीवेतन वितरण योजनेत समाविष्ट करण्यास मंजुरी प्राप्त झालेली आहे.

वरील संदर्भानुसार 'एसव्हीसी को.ऑप.बँक लि.' या बँकेच्या १९८ शाखांना या योजनेत समाविष्ट करण्यात येत आहे.

अतएव, ज्या नवीन निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना एसव्हीसी को.ऑप.बँक लि. या बँकेच्या शाखांमधून निवृत्तीवेतन घ्यावयाचे असेल त्यांनी बँकेचे विकल्प प्रपत्र भरुन नेहमीच्या पध्दतीने खात्यांमार्फत निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन दाव्यासह सादर करावे. तसेच सद्यस्थितीत निवृत्तीवेतन घेत असलेल्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना सदर बँकेत वेतन घ्यावयाचे असल्यास त्यांनी, एका लेखी अर्जासोबत बँक विकल्प प्रपत्र,निवृत्तीवेतन पुस्तक असल्यास त्याची पहिल्या व दुस-या पृष्ठाची छायांकीत प्रत,बँक पासबुकच्या पृष्ठाची छायांकीत प्रत ज्यामध्ये ACCOUNT NUMBER, MICR, व IFSC CODE नमुद असेल अन्यथा रद्द धनादेश (Cancelled Cheque) किंवा धनादेशाची छायांकीत प्रत लेखा अधिकारी (एफ.आय.बी.) या उपविभागात सादर करावे. तसेच परिपत्रक क्र.प्रले/एफसीएच/25 दि.20.01.2004 अन्वये ई.सी.एस.द्वारे अधिदान होत असल्यामुळे बँक विकल्प प्रपत्र भरुन घेणे आवश्यक आहे.

अतएव ,सर्व खाते प्रमुख, अधिष्ठाता (रुग्णालये) व सहाय्यक महानगरपालिका आयुक्त यांनी उपरोक्त बाबतची नोंद घेऊन आपल्या अखत्यारितील आस्थापना विभागास प्रत्येक कामगार / कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवानिवृत्तीवेळी सदर बँके संबधी निवृत्तीवेतन व्यवस्थेत समाविष्ट असल्याची बाब अवगत करून देण्याचे आदेश देण्यात यावेत व या परिपत्रकाची प्रत सुचना फलकावर माहितीसाठी लावण्याच्या सुचना संबधिताना द्याव्यात.

सदर परिपत्रकाची प्रत व बँकेच्या शाखाची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या intranet वर पुढील नमुद ftp://hr.mcgm.gov.in/circular/CA/Treasury/2023 या साईटवर उपलब्ध आहे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ portal.mcgm.gov.in वर Key microsites / Pension Section येथे देखील उपलब्ध करु देण्यात आले आहे.

**सही /-२३.०२.२०२३**
**(श्रीम.सुलोचना बा.कवडे)**
**प्रमुख लेखापाल (कोषागार)**

## परिपत्रक

## 2022-23

**क्र.प्रले(को)/एफआयबी/....... दि.............**

........................................... यांना प्रत (............ जादा प्रतींसह) माहितीकरीता व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**प्रमुख लेखापाल (कोषागार) यांजकरीता**